प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# समता रॅलीद्वारे 'बार्टी'ने महामानवास केले अभिवादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भारतीय संविधान अमृत महोत्सव समता सप्ताहानिमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे, निबंधक इंदिरा अस्वार यांच्या मार्गदर्शनाखाली ७ एप्रिल ते १४ एप्रिल यादरम्यान विविध कार्यक्रमांद्वारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. दरम्यान, बार्टी मुख्यालय ते पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत समता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

## संविधान जागृतीचा दिला संदेश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख वृषाली शिंदे यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख रवींद्र कदम, उमेश सोनवणे, शुभांगी पाटील, कार्यालय अधीक्षक डॉ. संध्या नारखेडे, मुख्याध्यापक जयश्री चेडगे, प्रकल्प व्यवस्थापक नितीन सहारे, सुमेध थोरात, महेश गवई, डॉ. सारिका थोरात, शुभांगी सुतार, स्तुती दैठणकर यांनीही अभिवादन केले. या रॅलीत येरवड्यातील अधिकारी व कर्मचारी, सफाई कामगारांच्या मुला-मुलांच्या निवासी शाळेमधील विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या वेशभूषेत सामाजिक समतेचा संदेश दिला. या रॅलीत भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकार व कर्तव्यांची जागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला. सूत्रसंचालन रामदास लोखंडे यांनी केले. जनसंपर्क अधिकारी स्तुती दैठणकर यांनी आभार मानले.

# महाराष्ट्राची भूमी

सदर बातमी चालू घडामोडीवर वाचकांसाठी उपलब्ध करून दिलेली असून सविस्तर बातमी आमच्या आगामी अंकात प्रकाशित करण्यात येईल.

साप्ताहिक MAG/SR/03/2021 MAHMAR/51177. मुख्य संपादक:- आनंदा बारवकर ऑफिस नं:-०२११९२२४५४५

# समता रॅली द्वारे बार्टीने महामानवास केले विनम्र अभिवादन - संविधान जागृतीचा दिला संदेश



विजय कांबळे प्रतिनिधी :

नागरगावं -- डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भारतीय संविधान अमृत महोत्सव समता सप्ताह निमित्त बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे, निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार यांच्या मार्गदर्शनाखाली ७ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमाद्वारे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विभागप्रमुख श्रीमती वृषाली शिंदे, यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख श्री रविंद्र कदम,श्री उमेश सोनवणे, शुभांगी पाटिल, कार्यालय अधीक्षक डॉ संध्या नारखेडे, मुख्याध्यापक जयश्री चेडगे, प्रकल्प व्यवस्थापक श्री नितीन सहारे, सुमेध थोरात, महेश गवई, डॉ सारिका थोरात, शुभांगी सुतार यांनीही अभिवादन केले. बार्टी मुख्यालय ते पुणे स्टेशन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळया पर्यंत समता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत अधिकारी व कर्मचारी शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलांची निवासी शाळा येरवडा, येथील विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या वेशभूषेत सामाजिक समतेचा संदेश दिला. या रॅलीत भारतीय संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्ये याची जागृती करण्यात आली. जिल्हाधिकारी पुणे कार्यालय समोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी केले. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला. याप्रसंगी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुला मुलांची निवासी शाळा येरवडा , पुणे येथील विद्यार्थी, शिक्षक कर्मचारी विविध क्षेत्रातील मान्यवर भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार जनसंपर्क अधिकारी स्तुती दैठणकर यांनी मानले.








मटा अँकर **'रुपयाची समस्या' या पुस्तकासह डॉ. बाबासाहेबांच्या अन्य साहित्यालाही मोठी मागणी**

# तरुण, तरुणींना राज्यघटनेबाबत उत्सुकता

अनुजा चवाथे
anuja.chawathey@timesofindia.com




> डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन प्रामुख्याने इंग्रजीतून असले तरी ते तळागाळापर्यंत पोहोचावे, यासाठी मराठीतून साहित्य उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. घटनाकारांच्या पलीकडे बाबासाहेबांना समजून घेण्याकडे वाचकांचा कल दिसून येतो.
>
> **- सुनील वारे, बार्टीचे महासंचालक**

**मुंबई :** माहितीचा भडिमार होण्याच्या काळात स्वतः कायदे समजून घेणे, राज्यघटनेची उद्दिष्टे, नागरिक म्हणून असलेली कर्तव्ये, अधिकार, राज्यघटनेचे तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी तरुणाई उत्सुक असल्याचे आशादायी चित्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या माध्यमातून सवलतीच्या दरामध्ये राज्यघटनेसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे साहित्य तसेच त्यांच्यावर आधारित साहित्याची विक्री केली जाते. राज्यभरात विविध ठिकाणी आयोजित होणाऱ्या प्रदर्शनातूनही हे साहित्य मोठ्या प्रमाणात विकले जात असून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते. यामध्ये राज्यघटना तसेच 'रुपयाची समस्या-मूळ आणि उपाय' या पुस्तकालाही मोठी मागणी आहे.

'बार्टी'च्या माध्यमातून २०१६पासून डॉ. आंबेडकरांचे मूळ साहित्य तसेच अनुवाद केवळ १५ टक्के किंमत घेऊन उपलब्ध करून देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर २०१६पासून २०२५ पर्यंत 'बार्टी'च्या माध्यमातून १७ लाख ९२ हजार ८४४ पुस्तकांची विक्री झाल्याचे 'बार्टी'तर्फे सांगण्यात आले. नवी दिल्लीमध्ये झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातही 'बार्टी'च्या स्टॉलवर मोठी गर्दी होती आणि केवळ या एका स्टॉलवरील विक्री व्यवहाराचा आकडा ८० लाख रुपयांच्या पुढे पोहोचल्याचा अंदाज संमेलनाचे आयोजक 'सरहद'चे संजय नहार यांनी व्यक्त केला. आज, सोमवारी, आंबेडकर जयंतीनिमित्त चैत्यभूमी येथेही असाच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची (पान ८वर)

# तरुणाईला राज्यघटनेबाबत उत्सुकता

(पान एकवरून)

आशा व्यक्त केली जात आहे. 'बार्टी'तर्फे १ जानेवारीला शौर्यदिन, २० मार्चला चवदार तळे सत्याग्रह, धम्मचक्र प्रवर्तन दिन, माणगाव परिषद, महापरिनिर्वाण दिन यांसारख्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांमध्ये पुस्तक स्टॉलचे आयोजन केले जाते. या सगळ्याच ठिकाणी सवलतीच्या दरातील पुस्तकांना मोठी मागणी असते.

घटनाकार या पलीकडे बाबासाहेबांना अर्थतज्ज्ञ म्हणून समजून घेण्याचीही वाचकांमध्ये उत्सुकता असून, या निमित्ताने 'रुपयाची समस्या- मूळ आणि उपाय' या अनुवादित पुस्तकालाही मोठी मागणी आहे. कर्नाटक सरकारची बेंगळुरूची आंबेडकर रिसर्च इन्स्टिट्यूट 'बार्टी'च्या संपर्कात असून, कन्नडमध्येही काही पुस्तकांचा अनुवाद करण्यात येणार आहे. तसेच या आधी तमिळमध्येही काही पुस्तकांचा अनुवाद झाला आहे, असे बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी सांगितले. फुले, आंबेडकर यांच्यावर आधारित मराठीतील काही लोकप्रिय पुस्तकांचा इंग्रजीतही अनुवाद होत असल्याचे ते म्हणाले. येत्या काळात काही पुस्तकांची ई-पुस्तके, राज्यघटनेचेही ई-पुस्तक तयार करण्यासाठी प्रयत्न होतील, असेही त्यांनी आश्वासन दिले.

सरकारच्या हर घर संविधान उपक्रमांतर्गत भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा आणि उच्च दर्जाची संविधानाची उद्देशिका मोफत उपलब्ध करून देण्याचा 'बार्टीचा प्रयत्न आहे, अशी माहिती प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी यांनी दिली. राज्यघटनेसोबतच बुद्ध आणि त्याचा धम्म, शूद्र पूर्वी कोण होते?, जातीव्यवस्थेचे निर्मूलन, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारत-पाकिस्तान विभाजन, बुद्ध की कार्ल मार्क्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकरः लेखन आणि भाषणे (खंड), हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती, अस्पृश्य मुळचे कोण? आदी पुस्तकांनाही मोठी मागणी असल्याचे त्या म्हणाल्या.